# मुंबई विद्यापीठ

क्र क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१८-१९/५

परिपत्रक :-

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्था. वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, संगणकीय नोंदणी प्रणालीद्वारे **(Bio-Metric)** वरून व विद्यापीठातील काही विभागांना मा. कुलगुरू यांनी प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर प्रशासनाच्या असे निदर्शनास आले की, विद्यापीठातील काही अधिकारी/कर्मचारी हे त्यांच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर राहत नाही.

कार्यालयीन परिपत्रक क्र. आस्था २(४)/३७९/१९९९ दिनांक १६ जुलै, १९९९ अन्वये विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या कार्यालयीन वेळा खालीलप्रमाणे नमूद करण्यात आल्या आहेत :-

| | | |
|---|---|---|
| १ | वर्ग अ-१ व ३ चे कर्मचारी | स.१०.२० ते सांय ६.०० पर्यत<br>(दु.१.०० ते १.३० पर्यत मधली सुट्टी) |
| २ | वर्ग - ४ चे कर्मचारी | स.१०.०५ ते सांय ६.१५ पर्यत<br>(दु.१.०० ते १.३० पर्यत मधली सुट्टी) |
| ३ | हमाल व सफाई कामगार | स.७.१५ ते स. ११.०० पर्यत<br>दु.२.१५ ते सायं ६.३० पर्यत |

उपरोक्त कार्यालयीन वेळेनुसार मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार सर्व कर्मचा-यांनी कार्यालयीन वेळेत हजर राहून कामकाजाला सुरूवात करणे अपेक्षित आहे, तसेच जे कर्मचारी वारंवार कार्यालयात उशीरा येतात अशा अधिकारी/कर्मचा-यावर प्रचलीत नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

त्याअनुषंगाने असे कळविण्यात येते की, सर्व विभाग प्रमुखांनी त्यांच्या अखत्यारित कार्यरत असणा-या सर्व अधिकारी/कर्मचा-यांना कार्यालयीन वेळेवर हजर राहण्याबाबत निर्देश देण्यात यावेत. तसेच कार्यालयात उशिरा येणा-या कर्मचा-यांवर कार्यालयीन परिपत्रक आस्था. २(४)/२९७/२००९, दिनांक २८ जुलै,२००९ अन्वये कार्यवाही करण्यात यावी. तरी सदर बाब संबंधित अधिका-यांच्या/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

कुलसचिव (प्र)

मुंबई-४०००३२
२९ मे, २०१८

क्र.आस्था(२/४)/इएसटी/आयसीसी/२०१८-१९/५ — २९ मे, २०१८

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,

प्रभारी संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
प्रभारी कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी, तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकारी
७. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख
८. उद्यान अधीक्षक/अधीक्षक (तांत्रिक), विधी विभाग
९. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) प्र--कुलगुरू, (३) कुलसचिव (प्र), (४) स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, (५) प्रभारी संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन ( मुनोवा)
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ,
३. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.

कुलसचिव (प्र)